


RNI NO-MAHMAR/2022/90217

दैनिक जनसंचलन — निडर निर्भिड — व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ
Mob- 9822720784
Email- jansanchlan@gmail.com




वर्ष ३ रे | अंक : १४ वा | सोमवार | दि. १० फेब्रुवारी २०२५ | पृष्ठ ८ | किंमत ३ रुपये

# पायाखालची वाळू सरकली.. आता आठवते देव!

## ईरला हत्याकांडातील दोन्ही आरोपींना ५ दिवसाची पोलीस कोठडी!

**बुलढाणा**

तालुक्यातील धामना नदी पात्रातुन वाळू उपसा व वाहतुक करण्याच्या वादातुन आरोपी वैभव ज्ञानेश्वर भोपळेने एकाच्या डोक्यात लोखंडी टामीने प्रहार करुन जागीच ठार केले व पुरावा नष्ट करण्यासाठी सांडलेल्या रक्तावर पवन ज्ञानेश्वर बकाल याने जेसीबीच्या साह्याने माती, रेती लोटुन मृतदेह धामणानदीच्या पुलाखाली टाकुन दिला. याप्रकरणी अटक करण्यात आलेल्या या दोन्ही आरोपींना ५ दिवसांची पोलीस कोठडी देण्यात आली आहे.

सदर गंभीर घटना बुलढाणा तालुक्यातील ईरला गावानजीकच्या धामणा नदीच्या पात्रात ६ फेब्रुवारी रोजी रात्री २ ते सकाळी ६ वाजेच्या दरम्यान घडली होती.

मृतक उमेश साहेबराव फदाट वय ३५ वर्ष रा.बोरगाव फदाट ता.जाफ्राबाद जि.जालना याची गावातीलच आरोपी वैभव ज्ञानेश्वर भोपळे व पवन ज्ञानेश्वर बकाल यांनी जेसीबी मशीन मधुन लोखंडी टामी काढत उमेशच्या डोक्यात लोखंडी मारले.

यामध्ये त्याचा जागीच मृत्यू झाला. अशी तक्रार मृतकाचा भाऊ राहुल फदाट यांचे फीर्यादी वरुन खुनाचा गुन्हा दाखल करत दोन्ही आरोपींना काल अटक करून आज बुलढाणा कोर्टात हजर केले असता आरोपींना १३ फेब्रुवारी पर्यंत ५ दिवसांची पोलीस कोठडी देण्यात आल्याची




माहिती धाडचे प्रभारी ठाणेदार जयसिंग राजपूत यांनी आज ९ फेब्रुवारीला सायंकाळी ७ वाजता दिली आहे.

# टूर्नामेंट गाजली! महिला क्रिकेटर मिताली राजने टोलवला आशावादाचा चेंडू!

## स्किल असेल तर बुलढाण्यातील खेळाडू भारतीय संघात खेळू शकेल! –आमदार गायकवाड यांच्यावरही उधळली स्तुती सुमने!

**बुलढाणा**

आमदार संजय गायकवाड यांनी क्रिकेटपटूंसाठी चांगला प्लॅटफॉर्म उपलब्ध केलाय. बुलढाणा शहराचे नाव जर उज्वल करायचे असेल तर,अशा टूर्नामेंट आयोजित व्हायला हव्या, यातूनच राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय खेळाडू निर्माण होतील.. स्किल असेल तर या मातीतला खेळाडू भारतीय संघात देखील दाखल होईल,अशा शब्दात भारतीय महिला क्रिकेट संघाच्या माजी कर्णधार मिताली राज यांनी आशावाद व्यक्त केला.

आमदार चषक २०२५ स्पर्धेच्या अंतिम सामन्यासाठी महिला क्रिकेटर मिताली राज आल्या असता, त्या बोलत होत्या. शहरातील जिजामाता प्रेक्षागार येथे लॉन, प्रेक्षक गॅलरी,व डे-नाईट मैदानाचा भूमिपूजन सोहळा आमदार गायकवाड यांच्या उपस्थितीत महिला क्रिकेटर मितालीजी राज यांच्याहस्ते संपन्न झाला.

शिवसेना मुख्यनेते तथा उपमुख्यमंत्री ना. एकनाथराव शिंदे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून धर्मवीर आखाडा बुलढाणाच्या सौजन्याने भव्य या आमदार चषक चे आयोजन करण्यात आले होते. या आमदार चषक टेनिस क्रिकेट अंतिम सामन्यासाठी भारताच्या माजी महिला कर्णधार मिताली राज यांचे आगमन झाले होते.त्यांचे व आमदार गायकवाड यांचे जंगी स्वागत करण्यात आले. दरम्यान प्रथम क्रमांकाचे ७,७७,७७७ रुपयाचे पारितोषिक राजा शिवछत्रपती क्रिकेट टीमला तसेच द्वितीय क्रमांकाचे ३,३३,३३३ रुपयाचे पारितोषिक त्रिशा-११ ला आमदार संजय गायकवाड यांच्याहस्ते प्रदान करण्यात आले. सदरसामने यशस्वी होण्यासाठी अनेकांचे सहकार्य लाभले यामध्ये प्रामुख्याने युवासेना महाराष्ट्र राज्यकार्यकारिणी सदस्य युवानेते मृत्युंजय संजय गायकवाड, धर्मवीर आखाडा अध्यक्ष पृथ्वीराज संजय गायकवाड, युवासेना शहर प्रमुख श्रीकांत गायकवाड, नगरपालिकेचे



माजी आरोग्य सभापती आशिष जाधव, किसान सेना जिल्हाप्रमुख संदीप गायकवाड, विजय दुरणे,पवन भालेराव, जीवन उबरहंडे, प्रसाद फदाट, राजू पाटील,नितीन नेमाने,विशाल खंडारे, सागर उबाळे, स्वप्निल पाटील, बाळा देशमुख उमेश बर्डे,चेतन सोनुने, समालोचक ओम सोनुने यांच्यासह अनेकांचे सहकार्य लाभले.

# दुर्गा भागवत: भारतीय समाजवादी लेखिका!

**दुर्गा भागवत या लोकसंस्कृती आणि लोककलेचे संशोधक म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यांनी सुरेख लेखनही केले आहे. त्यांना बौद्ध अभ्यासक, समाजशास्त्रज्ञ आणि मानववंशशास्त्रज्ञ म्हणूनही ओळखले जाते. जयंतीनिमित्त त्यांच्या कार्यकौशल्यांची ज्ञानवर्धक माहिती श्री.एन. कृष्णकुमारजींच्या या शब्दशैलीतून...**



संपादकीय लेख

दुर्गा नारायण भागवत या भारतीय विद्वान व समाजवादी लेखिका होत्या. त्यांनी संस्कृत आणि बौद्ध साहित्याचा अभ्यास करून आदिवासी जीवनाचा अभ्यास करण्यासाठी मध्य प्रदेशातील जंगलात वेळ घालवला. नंतर त्या संशोधक म्हणून मुंबईत परतल्या आणि मराठीत पुस्तके लिहिली. मराठीतील त्या अग्रगण्य महिला दलित लेखिका आहेत. आणीबाणीला विरोध करणाऱ्या प्रमुख लेखकांपैकी त्या एक होत्या. आज त्या नवलेखिकांच्या प्रेरणास्रोत ठरत आहेत. पद्मश्री आणि ज्ञानपीठ यांसारखे संस्थात्मक आणि नागरी सन्मान स्वीकारण्यापासूनही त्यांनी स्वतःला दूर ठेवले. दुर्गा भागवतजी यांची काही प्रसिद्ध पुस्तके अशी- १)ॲन आउटलाइन ऑफ इंडियन फोकलोअर २) रिडल इन इंडियन लाईफ ३) लोअर अँड लिटरेचर ४) अ डायजेस्ट ऑफ कंपरेटिव्ह फिलॉलॉजी ५) रोमान्स इन सँक्रिड लोअर ६) अ प्रायमर ऑफ अँथ्रॉपॉलॉजी ७) अर्लि बुद्धिस्ट ज्युरिस्प्रुडन्स इत्यादी इंग्रजी ग्रंथ, तर ८) हेन्री डेव्हिड थोरो यांच्या ग्रंथांचे मराठी अनुवाद- पैस ९) व्यासपर्व १०) डूब ११) ऋतुचक्र १२) महानदीच्या तीरावर १३) पूर्वा १४) रूपरंग १५) लोक साहित्याची रूपरेखा १६) धर्म व लोकसाहित्य १७) भावमुद्रा १८) केतकरी कादंबरी १९) प्रासंगिका आणि २०) जनतेचा सवाल आदी मराठी पुस्तके आहेत.

दुर्गा भागवत या लोकसंस्कृती आणि लोककलेचे संशोधक म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यांनी सुरेख लेखनही केले आहे. त्यांना बौद्ध अभ्यासक, समाजशास्त्रज्ञ आणि मानववंशशास्त्रज्ञ म्हणूनही ओळखले जाते. दुर्गा भागवतजींचा जन्म दि.१० फेब्रुवारी १९१० रोजी इंदूर येथे झाला. त्यांचे शिक्षण मुंबई, अहमदनगर, नाशिक, पुणे अशा विविध ठिकाणी झाले. त्यांनी मुंबईच्या सेंट झेवियर्स कॉलेजमधून सन १९३२मध्ये बीए परीक्षा उत्तीर्ण केली. पुढे सन १९३५ साली त्यांनी एमएची पदवी संपादन केली. शिक्षण घेत असतानाच त्यांनी भारताच्या स्वातंत्र्य चळवळीतही भाग घेतला. शिक्षण पूर्ण केल्यानंतर दुर्गाजींनी पुण्याच्या गोखले इन्स्टिट्यूट ऑफ इकॉनॉमिक्समध्ये समाजशास्त्र विभागाच्या प्रमुख म्हणून दोन वर्षे काम केले. काही दिवसांनी त्यांनी ङ्गसाहित्य सहकारफ या मासिकाचे संपादनही केले. त्यांनी लोकसाहित्य आणि मानववंशशास्त्र या विषयांवर विपुल प्रमाणात संशोधनात्मक लेखन केले आहे. या विषयांवरील त्यांचे बरेचसे ग्रंथ इंग्रजीमध्ये आहेत. त्यांनी वैचारिक व समीक्षात्मक लेखनही केले आहे. साने गुरुजींच्या प्रेरणेतून त्या ललित लेखनाकडे वळल्या आणि आपल्या ललित लेखनाद्वारे त्यांनी मराठी साहित्यात मोलाची भर घातली.

दुर्गा भागवत स्वलेखनाच्या कट्टर पुरस्कर्त्या आहेत. त्यासाठी त्यांनी आणीबाणीच्या काळात सन १९७५-७७मध्ये कारावासही भोगला होता. साहित्यिक व विचारवंत यांनी शासकीय पुरस्कार स्वीकारून शासनाचा मिंधेपणा पत्करू नये, असे त्यांचे ठाम व करारी मत होते. अनेक सामाजिक चळवळींतही त्यांचा सहभाग आहे. त्यांच्या ङ्गपैसङ्ग या ग्रंथाला ङ्गसाहित्य अकादमीङ्ग पुरस्कार लाभला आहे. सन १९७५मध्ये कराड येथे भरलेल्या मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद त्यांनी भूषविले होते. अभिजात रसिकता, सौंदर्यासक्ती, जीवनोत्सुक आशाप्रवण वृत्ती, तीव्र संवेदनशीलता, काव्यात्मकता व मर्मग्राही कुतूहल यांचे अपूर्व रसायन त्यांच्या व्यक्तिमत्त्वात असून त्यांच्या साहित्यातही त्याचे प्रतिबिंब पडले आहे. या सर्वांना त्यांचा सखोल व्यासंग व मार्मिक विश्लेषण यांची जोड मिळाली आहे; त्यामुळे त्यांच्या लेखनाला एक आगळा आशय व प्रगल्भता प्राप्त झाली आहे. दुर्गा भागवतजी यांचे निर्वाण दि.८ मे २००२ रोजी मुंबई येथे झाले. त्यांचे साहित्य आज महिला साहित्यिकांना प्रचंड ऊर्जा पुरवित आहे, हे येथे उल्लेखनीय!

!! त्यांच्या गौरवशाली लेखन कौशल्याला जयंतीदिनी विनम्र अभिवादन !!

# गो. से. महाविद्यालयामध्ये मतदार दिन उत्साहात साजरा

जनसंचलन/ खामगांव



विदर्भ शिक्षण प्रसारक मंडळ गो से विज्ञान कला व वाणिज्य महाविद्यालयात राज्यशास्त्र विभागाद्वारे मतदार दिन साजरा करण्यात आला या याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा डॉ धनंजय तळवणकर सर यांनी आपल्या भाषणातून भारताच्या लोकशाहीवर विविध अंगाने प्रकाश टाकला ज्यामध्ये व्यक्तीला मिळालेल्या विविध अधिकारांपैकी मतदानाच्या अधिकारावर व्यक्तीने घेण्याची जबाबदारी व आपल्या अधिकारातून लोकशाही बळकटी करण्यामध्ये मतदारांचा असलेला सहभाग किती महत्त्वपूर्ण आहे यांचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून दिले कार्यक्रमाच्या प्रसंगी राज्यशास्त्र विभागाचे प्र डॉ बी एम टकले यांनी मतदार यांनी आपला प्रतिनिधी निवडताना कोणत्याही प्रलोभनाला बळी न पडता निपक्षपाती मतदान करण्याची जबाबदारी पार पाडणे महत्त्वाचे आहे असे सांगितले त्याबरोबरच विद्यार्थ्यांना मतदार प्रतिज्ञा घेऊन शपथ दिली या कार्यक्रमाला प्रा. विक्रम मोरे, प्रा. डॉ. रागिब देशमुख प्रा. डॉ. नीता बोचे, प्रा. सचिन शिंगणे, प्रा. भुतेकर, प्रा. खंदारे, प्रा सरकटे, प्रा. ढाकणे, प्रा बानायत, प्रा. वाघमारे, प्रा. घोराळे, प्रा. गवई त्याचबरोबर मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते शेवटी कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन मराठी विभागाचे प्रा दत्तात्रय भुतेकर सर यांनी मानले. अशी माहिती एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे प्रसिद्धी प्रमुख प्रा. डॉ. मोहम्मद रागिब देशमुख यांनी दिली आहे.

# ई-केवायसीसाठी २८ फेब्रुवारीपर्यंत मुदत

जनसंचलन/ शेगाव

तालुक्यातील शिधापत्रिकाधारकांनी ई-केवायसी प्रक्रिया २८ फेब्रुवारीपर्यंत तातडीने पूर्ण करण्याचे आवाहन तहसीलदार दीपक बाजड यांच्या मार्गदर्शनाखाली निरीक्षण अधिकारी (पुरवठा) संतोष बावणे यांनी केले आहे. अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागांतर्गत राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेंतर्गत अंत्योदय अन्न योजना व प्राधान्य कुटुंब योजना लाभार्थ्यांसाठी शासकीय धान्याचा नियमित लाभ सुरू ठेवण्यासाठी ई-केवायसी प्रक्रिया अनिवार्य करण्यात आली आहे. यासाठी ६ ते २८ फेब्रुवारीदरम्यान विशेष मोहीम राबविली जात आहे. संबंधित लाभार्थ्यांनी गावातील स्वस्त धान्य दुकानदारांच्या संपर्कात राहून त्वरित ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करावी. यासाठी लाभार्थ्यांनी आधार कार्ड व रेशन कार्ड सोबत न्यावे. तसेच, रास्तभाव दुकानात प्रत्यक्ष उपस्थित राहून पॉस मशीनवर बायोमेट्रिक पडताळणी करणे आवश्यक आहे. त्यामुळे ई केवायसी करण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे.

# मुंगसरी शिवारात बिबट्याचा हल्ला, वासरू जखमी; शेतकऱ्यांमध्ये घबराट

**चिखली (प्रतिनिधी)**

चिखली तालुक्यातील मुंगसरी शिवारात दि. ८ फेब्रुवारीच्या रात्री बिबट्याने हल्ला करून समाधान भाऊराव इंगळे यांच्या गट क्र. ९२ मधील गोठ्याबाहेर बांधलेल्या वासराला गंभीर जखमी केले. या घटनेमुळे शिवारातील शेतकऱ्यांमध्ये प्रचंड घबराट पसरली आहे. संबंधित घटनेत बिबट्याने वासरावर हल्ला केला असून, वासराला गंभीर जखमा झाल्या आहेत. मध्यरात्री घडलेल्या या घटनेमुळे परिसरातील शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. यापूर्वीही मुंगसरी परिसरात वन्यप्राण्यांची हालचाल पाहण्यात आली होती, मात्र वन विभागाकडून यावर कोणतीही ठोस पावले उचलली गेली नाहीत, असा शेतकऱ्यांचा आरोप आहे.



**वन विभागाच्या हलगर्जीपणावर शेतकऱ्यांचा रोष**

घटनेनंतर शेतकऱ्यांनी वन विभागाला माहिती दिली असली तरीही बिबट्याला पकडण्यासाठी अद्याप कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही. वन विभागाच्या दुर्लक्षामुळे गावकरी अधिकच चिंतेत आहेत. शेतकऱ्यांनी परिसरात रात्री गस्त वाढवण्याची मागणी केली असून, वन विभागाने तत्काळ उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे.

**घबराट वाढली,** उपाययोजना आवश्यक

बिबट्याच्या हल्ल्यामुळे मुंगसरीसह परिसरातील शेतकऱ्यांनी आपल्या जनावरांच्या सुरक्षेसाठी उपाययोजना सुरू केल्या आहेत. मात्र, वन विभागाच्या हलगर्जीपणामुळे गावकऱ्यांमध्ये नाराजीचा सुर आहे. प्रशासनाने या प्रकरणी तातडीने पावले उचलून शिवारातील शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# अ.भा.मारवाडी संमेलन भरणार.. महिला उद्योजिकांच्या पंखात बळ ! -कोमल ताई झवर यांच्या हस्ते थाटात उद्घाटन!

## -एकाच छताखाली गृहपयोगी वस्तू उपलब्ध!



**बुलढाणा**
ऑनलाइन शॉपिंगचा धोका लक्षात घेऊन व महिला उद्योजिकांच्या पंखात बळ भरण्यासाठी येथील रेणुका मंगल कार्यालयात अखिल भारतीय मारवाडी महिला संमेलन आयोजित करण्यात आले आहे.या संमेलनात एका छताखाली गृहपयोगी सर्व साहित्य विविध जिल्ह्यातून उपलब्ध करण्यात आले असून येथे लावण्यात आलेल्या स्टॉलला भेट देण्याचे आवाहनही आयोजकांनी केले आहे. सहकार विद्या मंदिराच्या अध्यक्षा कोमलताई झवर यांच्या हस्ते अखिल भारतीय मारवाडी संमेलनाचे शानदार उद्घाटन करण्यात आले. यावेळी सपना अग्रवाल,वर्षा जैन,डॉ.वसुंधरा गायकवाड,हेमा बोथरा, सरला अग्रवाल, डॉ.छाया महाजन,प्रणिता लाहोटी,कल्पना मुंदडा,राधिका अग्रवाल,अस्मिता अग्रवाल,ममता झवर,मोनिका खंडेलवाल,किरण चिरानिया,शितल मावतवाल,श्रेया डालमिया, किरण वर्मा आदींची प्रमुख उपस्थिती होती.अखिल भारतीय महिला मारवाडी संघटनेने पहिल्याच वर्षी हे संमेलन आयोजित केले आहे.या संमेलनात संभाजीनगर, खंडवा, सिल्लोड, खामगाव, जळगाव, भुसावळ अशा अनेक जिल्ह्यातील गृहपयोगी विविध वस्तूंचे स्टॉल लावण्यात आले आहेत.अलीकडे ऑनलाईन खरेदीकडे लोकांचा कल वाढला असून आपल्याच गावातील व्यवसायिकांचे नुकसान होत आहे.महिला उद्योजिकांच्या पंखांना उभारी मिळावी व यातून महिला सशक्तिकरण व्हावे या उद्देशाने हा उपक्रम राबवित असल्याचे आयोजकांनी सांगितले आहे. दरम्यान कोमल ताई झवर यांनी या उपक्रमाचे कौतुक केले असून, महिला व नागरिकांनी रेणुका मंगल कार्यालयातील या संमेलनाला भेट द्यावी असे आवाहन केले आहे.

## कानामागून आली अन्...; रि-रिलीज होऊनही सनम तेरी कसमला प्रेक्षकांची पसंती, तर लव्हयापा फ्लॉपच्या मार्गावर




मुंबई - सुपरस्टार आमिर खानचा मुलगा जुनैद खानचा लव्हयापा हा चित्रपट आणला. हा चित्रपट ७ फेब्रुवारी रोजी प्रदर्शित झाला. जुनैदचा हा पहिलाच थिएटरमध्ये प्रदर्शित होणारा चित्रपट आहे. या चित्रपटात तो श्रीदेवींची मुलगी खुशी कपूरसोबत दिसतोय. खुशी कपूरचा हा पहिलाच थिएटर रिलीज आहे. चित्रपटाबद्दल बरीच चर्चा निर्माण झाली. खुशी आणि जुनैद यांनी सिनेमाचं जोरदार प्रमोशन केलं. आमिर खाननेही चित्रपटाचं प्रमोशन केलं. पण चित्रपटाच्या कलेक्शनचे आकडे पाहिल्यानंतर असं दिसतंय की, सिनेमाकडे प्रेक्षकांनी पाठ फिरवलीये.

लव्हयापा चित्रपटाचं बॉक्स ऑफिस कलेक्शन

लव्हयापा १.१५ कोटींनी ओपन झाला. सॅकनिल्कच्या रिपोर्टनुसार, चित्रपटाने दुसऱ्या दिवशी १.५० कोटी रुपये कमावले आहेत. यानुसार, चित्रपटाचं आतापर्यंतचं एकूण कलेक्शन २.६५ कोटी रुपये आहे. चित्रपटाच्या बजेटनुसार हे खूपच कमी आहे. हिमेश रेशमियाच्या बॅडास रविकुमार सिनेमाला वाईट प्रतिसाद मिळूनही यापेक्षा चांगलं कलेक्शन करत आहे.

लव्हयापा सनम तेरी कसमपेक्षा मागे पडला

सनम तेरी कसम हा चित्रपट पुन्हा प्रदर्शित झाल्यानंतर पहिल्याच दिवशी हिट झाला. या चित्रपटाने पहिल्या दिवशी ५.१४ कोटी रुपयांचा व्यवसाय केला आहे. हा चित्रपट २०१६ मध्ये प्रदर्शित झाला होता. या चित्रपटात पाकिस्तानी अभिनेत्री मावरा होकेन आणि हर्षवर्धन राणे मुख्य भूमिकेत होते. हा चित्रपट आता ७ फेब्रुवारी रोजी प्रदर्शित झाला आहे. व्हॅलेंटाईन वीकचा फायदा या चित्रपटाला झालाय.

लव्हयापा दोन दिवसांत फ्लॉप झाला

लव्हयापा ही एका तरुण जोडप्याची कथा आहे जे २४ तास एकमेकांचे फोन अदलाबदल करतात. यानंतर कथेत अनेक ट्विस्ट येतात.

लव्हयापा हा तमिळ चित्रपट लव्ह टुडेचा रिमेक आहे. लव्ह टुडेचं दिग्दर्शन प्रदीप रंगनाथन यांनी केलं होतं. हा चित्रपट ६ कोटी रुपयांच्या बजेटमध्ये बनवण्यात आला होता. लव्ह टुडे हा चित्रपट चाहत्यांना खूप आवडला आणि चित्रपटाने ८३.५५ कोटी रुपये कमावले. खुशी कपूर आणि जुनैद खानच्या चित्रपटाबद्दल बोलायचं झालं तर त्यांचं बजेट खूप मोठं आहे. इंडियन एक्सप्रेसच्या वृत्तानुसार, हा चित्रपट ६० कोटी रुपयांच्या बजेटमध्ये बनवण्यात आला आहे.

## प्राजक्ता माळी पोहोचली महाकुंभमेळ्यात; अभिनेत्रीने केलं पवित्र स्नान



**मुंबई** - प्रयागराज येथील महाकुंभमेळ्याची चर्चा सध्या जोरदार सुरू आहे. सामान्यांपासून ते अनेक मोठ-मोठ्या कलाकारांपर्यंत सगळेच महाकुंभमेळ्याला हजेरी लावत असून पवित्र स्नानाचा आनंद घेत आहेत. प्रवीण तरडे, स्वप्नील जोशी, सौरभ चव्हाण यांसारखे मराठी कलाकार प्रयागराज येथील महाकुंभमेळ्यात पोहोचले होते. अशातच आता मराठी अभिनेत्री प्राजक्ता माळीसुद्धा प्रयागराजला पोहोचली होती. अभिनेत्रीने महाकुंभमेळ्यातील सुखद अनुभव व्हिडिओद्वारे शेअर केला आहे. प्राजक्ताने नुकतीच सोशल मीडियावर पोस्ट शेअर केलीये. प्राजक्ताने महाकुंभमेळ्यातील व्हिडिओ शेअर करत कॅप्शनमध्ये लिहिलंय की, तीर्थराज - प्रयागराज महाकुंभ २०२५ लहानपणापासूनच कुंभ मेळ्याविषयी मनात कुतूहल होतं. १४४ वर्षांनी होणारा हा मेळा याची देही याची डोळा पहावा, अनुभवावा असं मनात आलं आणि पोचले सनातनधर्म त्रिवेणीसंगमप्रयागराज गंगा यमुना सरस्वती संगमघाट भारतभूमी संतांचीभूमी असे हॅशटॅग वापरले आहेत. अभिनेत्रीच्या या पोस्टवर नेटकऱ्यांनी, मर्यादा, संस्कार, सौंदर्य, कला याचा उत्तम संगम म्हणजे प्राजक्ता मॅम आणि तीन नद्यांचा संगम म्हणजे प्रयागराज, खूप भाग्यवान आहात मॅम तुमच्या नशिबात हा योग होता सत्य सनातन धर्म की जय, हर हर महादेव, ओम नमः शिवाय, एक कलाकार म्हणून तुम्ही भारी आहातच पण एक माणूस म्हणून खूप धार्मिक आहात, मराठी फिल्म इंडस्ट्रीचं भाग्य आहे कारण, तुमच्यासारखी अभिनेत्री आहे अशा कमेंट्स केल्या आहेत. दरम्यान, प्राजक्ता माळीच्या वर्क फ्रंटबद्दल सांगायचं तर ती तिच्या २०२४ मध्ये प्रदर्शित झालेल्या फुलवंती या सिनेमामुळे चर्चेत आली होती. या सिनेमातील तिच्या नृत्याचं कौतुकही झालं. त्याचबरोबर प्राजक्ता महाराष्ट्राची हास्यजत्रा या कार्यक्रमाचं सूत्रसंचालन देखील करते. प्राजक्ता माळी आता प्रसाद खांडेकर दिग्दर्शित चिकी चिकी बुबुम बुम या २८ फेब्रुवारी २०२५ रोजी प्रदर्शित होणाऱ्या सिनेमातून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.

# आज हृदय मम विशाल झाले

मराठीत जेवढे प्रयोग झाले असतील, तेवढे अन्य कोणत्याही भारतीय भाषात झाले नसावेत. मग ते काव्य असो, नाट्य असो सिनेमा असो की साहित्य असो. अनेकदा मराठीतून प्रेरणा घेऊन इतर भारतीय भाषात लिखाण झालेले आहे. एक अपवाद म्हणजे फार तर बंगाली साहित्य आणि गुरुवर्य रवींद्रनाथ टागोरांचे साहित्य. बाकी माझी मराठी महानच!


कविवर्य शंकर वैद्य यांची एक कविता अशाच बाबतीत लक्षणीय ठरते. अरुण दाते यांनी गायलेल्या या गाण्याला संगीत आहे हृदयनाथ मंगेशकर यांचे! त्यांनी अरुण दातेंच्या आवाजात या गाण्याचा आशय अगदी यथार्थपणे श्रोत्यांपर्यंत पोहोचवला आहे. कारण ही कविता, हे भावगीत काही एक सर्वसाधारण कविता नाही. तो एक मोठा गूढ असा आध्यात्मिक अनुभव आहे. कविवर्य शंकर वैद्य यांनी तो शब्दांत कैद करण्याचे जवळजवळ अशक्य काम लीलया करून दाखवले.

या नितांत सुंदर गाण्याचे शब्द होते

आज हृदय मम विशाल झाले,
त्यास पाहुनी गगन लाजले

पहिल्याच दोन ओळीत लक्षात येते की, ही कविता, हे गीत काही सोपे नाही. ते समजावून घ्यावे लागेल. चक्क आकाश एका माणसाच्या हृदयाचे विशालपण पाहून लाजेल? इतके विशाल हृदय? कसे शक्य आहे? मुळात माणूस माणूस तो काय? त्याचे एका मुठीच्या आकाराचे हृदय ते केवढे? आणि त्याला पाहून आकाशाने लाजायचे? म्हणजे हा तर ङ्कमुंगी उडाली आकाशी, तिने गिळिले सूर्याशीफसारखी उपमा झाली. छे! अशक्य! ज्यांना महाराष्ट्र ङ्कमाऊलीफ म्हणून ओळखतो त्या ज्ञानेश्वरांचे ठीक आहे. पण शंकर वैद्य? आणि इथेच तर गंमत आहे. वैद्यांनीसुद्धा फार वेगळा, फार उदात्त अनुभव इथे शब्दांत मांडला आहे. संत तुकारामांचे अभंग हे उत्तम उपमा अलंकार यांनी सजलेले अक्षर साहित्य म्हणून आजही अभ्यासले जाते. महाराजांनी जमेल तितके सोपे लिहिण्याचा प्रयत्न केला हेही सत्यच! मात्र त्यांची एक रचना या पार्श्वभूमीवर उठून दिसते. ङ्कअणूरणीया थोकडा, तुका अकशाएवढा!फ हा अभंग केवळ काव्यरचना नाही तो एक अतिंद्रिय अनुभव आहे. काहीसा तसाच प्रकार शंकर वैद्य यांनी आपल्या अतिसंक्षिप्त कवितेत मांडलेला दिसतो. ते म्हणतात माझी जाणीव, माझी चेतना इतकी अवाढव्य झाली की ती आकाशात मावेना! माझ्यातून निघणारे किरण माझे हात झाले आणि मी अवघी पृथ्वी ओंजळीत घेतली! अवकाशात तळपणारा सूर्य मला माझ्या कपाळावरचे गंधच वाटू लागला! केवढी जबरदस्त कल्पना! ङ्कपॅराडाइज लॉस्टफ या खंडकाव्यात जॉन मिल्टनने वापरली होती तशी अतिभव्य शैली!शंकर वैद्यांच्या गीताची पुढची ओळ, तर अलीकडे पाश्चिमात्य देशात अतिशय लोकप्रिय झाल्याने चर्चेत असलेल्या एन.डी.ई. म्हणजे निअर डेथ एक्स्पिरियन्स या अनुभवाइतकी चित्रमय आहे

त्या विश्वाच्या कणाकणांतून,
भरून राहिले अवघे मी पण



एन.डी.ए.बद्दल सांगायचे, तर सिंगापूरमधील अनिवासी भारतीय असलेल्या अनिता मुराजानी यांचे त्या विषयावरचे अनेक व्हीडिओ आज यूट्यूबवर आहेत. त्यांना कर्करोग झाला होता आणि त्या इस्पितळात अतिदक्षता विभागात शेवटच्या घटका मोजत होत्या. शरीराच्या सगळ्या संस्था-रक्ताभिसरणसंस्था, मज्जासंस्था, श्वसनसंस्था, पंचनसंस्था बंद पडू लागल्या होत्या. डॉक्टरांनी त्यांच्या नातेवाइकांना ङ्करुग्ण आता केवळ काही तासांचा सोबती आहे.फ त्यामुळे जवळच्या सर्वांना शेवटच्या भेटीसाठी बोलावून घ्यायलाही सांगितले होते. अनिता मुरजानी यांचा भाऊ भारतात होता. आपल्या बहिणीच्या जीवनाचे केवळ काहीच तास शिल्लक आहेत, असा निरोप मिळाल्याने तो प्रचंड चिंतेत पडला. अत्यंत विमनस्क मन:स्थितीत विमानतळावर काहीही करून सिंगापूरच्या विमानाचे तिकीट मिळवण्याचा प्रयत्न करत होता. आणि क्षणार्धात ते घडले! अनिताबाई या जगातून गेल्या. त्यांची जाणीव, शरीरातून बाहेर पडली. त्यांना स्वत:चे लोळागोळा होऊन दवाखांच्या कॉटवर पडलेले शरीर दिसत होते. इतकेच नाही, तर ङ्कत्या कोमात आहेतफ असे वाटत असताना डॉक्टर तळमजल्यावर त्यांच्या पतींशी जे बोलत होते, ते शब्द त्यांना स्पष्ट ऐकू येऊ लागले. दूर भारतात असलेल्या भावाच्या मनातील विचारही कळू लागले. त्यांनी म्हटले आहे की, भावाचे मन, जवळच्या इतर अनेकांचे मन आणि माझे मन एकच झाले होते. मला त्याक्षणी सगळ्यांच्याच मनातले विचार कळत होते

मृत्यूनंतर मनाचे एकदम असे वैश्विक प्रसरण होते, ही काही कविकल्पना नाही. ते एक सत्य आहे हीच गोष्ट अनेक आध्यात्मिक व्यक्तींच्या पुस्तकात, व्हीडिओत अनेकदा आलेली आहे. शंकर वैद्यांच्या बाबतीत नेमके काय होते ते जरी आपल्याला माहीत नसले तरी या कवितेतून प्रकट होणारा अनुभव हुबेहूब तसाच आहे. आपल्या कवितेत ते पुढे म्हणतात

आज माझिया किरणकरांनी
ओंजळीमध्ये धरली अवनी
अरुणाचे मी गंध लाविले
ते पुढे म्हणतात
त्या विश्वाच्या कणाकणांतून
भरून राहिले अवघे मी पण
फुलता फुलता बीज हरपले

माझी केवळ माझ्या स्थूल शरीरात बंदिस्त असलेली जाणीव मुक्त झाली आणि विश्वाच्या कणाकणात गेली. जणू अंकुरित होताना, फुलताना, झाडाचे मूळ बीज नष्ट व्हावे, भोवतालच्या अस्तित्वात विलीन व्हावे, विरून जावे आणि त्याचा वृक्ष व्हावा तितका सहज नैसर्गिक अनुभव! संत तुकारामांचा अभंगही हेच सांगतो. महाराज म्हणतात, अणूहून लहान असलेले माझे अस्तित्व आकाशाएवढे विशाल असल्याची जाणीव मला झाली. शरीराच्या मर्यादांचा आणि मूळ चैतन्याच्या विश्वव्यापीपणाचा अनुभव आला. त्यामुळे मी बाहेर पडून आत्मसाक्षात्कार अनुभवला! दृश्य जगाच्या भ्रमातून मी बाहेर पडलो! आता आतला अंधार पूर्णत: संपला आहे.

अणुरेणियां थोकडा,
तुका आकाशाएवढा
गिळुन सांडिले कलेवर,
भव भ्रमाचा आकार
सांडिली त्रिपुटी दीप उजळला घटी
तुका म्हणे आता, उरलो
उपकारापुरता

एक संत आणि एका आधुनिक कवीच्या लेखनात जे साम्य आढळले, ते नोंदवावेसे वाटले म्हणून हा नॉस्टॅल्जिक प्रपंच!

# टैट सिंड्रोम : थकवणारा आजार

सध्या या सिंड्रोमविषयी फारशी जागरूकता नाही, तसंच संशोधनाच्या पातळीवरही बरंच काम बाकी आहे. त्यामुळे या आजाराविषयी जनजागृती होणं अतिशय महत्वाचं आहे.

वैद्यकीय शास्त्रात टैट सिंड्रोम हा काही नवीन शब्द नाही. यामध्ये थकव्यामुळे लोकांना अंथरुणातून उठण्याचीही इच्छा होत नाही. काही जणांना तर पेशींमध्ये वेदना, कमजोरी, डोकेदुखी आणि ताप यांसारख्याही समस्या होतात. याचा सगळ्यात दु:खद पैलू असा की, लोकांना याचं कारण माहीत नसल्यामुळे वर्षानुवर्षं लोक या समस्येने त्रस्त राहतात.

कारणं : या आजारासाठी सध्यातरी अनेक कारणं ज़बाबदार मानली जातात. उदाहरणार्थ शारीरिक, मानसिक, जीवनशैली किंवा आहाराशी संबंधित गोष्टी. काही आजार, गर्भावस्था आणि स्तनपान ही कारणंही मानली जातात. त्याचबरोबर घर बदलणे, कौटुंबिक किंवा व्यावसायिक समस्यांमुळे तणाव, दबाव वाढविणारी कारणंही जबाबदार ठरतात.

शारीरिक बदल : लठ्ठपणाबरोबरच शारीरिक बदलालाही थकव्यासाठी जबाबदार मानले जाते. ऍनिमिया, थायरॉइड व हृदयाशी संबंधित तमाम आजारांमुळेही व्यक्ती थकल्यासारखी वाटते. त्याचबरोबर घोरणं आणि अनिद्रा या समस्याही जबाबदार ठरतात. भावनात्मकदृष्ट्या तणाव आणि चिंता थकव्याला आमंत्रण देते. थोडक्यात काय तर कोणतीही आरोग्य समस्या किंवा लक्षणं



दिसल्यास त्याकडे दुर्लक्ष करू नका. त्याविषयी तुमच्या डॉक्टरांशी मोकळेपणाने बोला. त्यांना ठरवू द्या की, तुमची समस्या काय आणि त्यावर काय उपाययोजना करायची. असं केलं तर निश्चितपणे कोणतीही समस्या गंभीर होण्याआधी त्यावर उपचार सुरू होतील.

# सीतेचे अश्रू



माळरानावर फुललेल्या वनस्पतीमध्ये अंगठ्याएवढ्या फुलांची मुळी उगवलेली असायची. या गडद जांभळ्या मुळीमध्ये पाणीदारपणा ठसठशीत भरलेला असायचा. ही वनस्पती पावसात भरभरून बहरायची ती फक्त माळरानावरच. इथे अनेक प्रकारच्या वनस्पती उगवायच्या. फुलांनी अवघं माळरान फुलून जायचं. पिवळ्या, गुलाबी, जांभळ्या फुलांची चादरच जणू अंथरल्यागत वाटायची. या फुलांमध्ये या मुळी आपलं अस्तित्व टिकवून राहायच्या त्या अगदी कायम. या मुळींना सीतेची टीपं असे म्हटले जायचे. टीपं म्हणजे अश्रू. हे सीतेचे अश्रू रोज शाळेत जाताना नित्याने दृष्टीस पडायचे. कधी नाइलाजास्तव त्यावरून चालताना अंतःकरण जड व्हायचे. माळरानावरून चालताना ही सीतेची टीपं म्हणजे अगदी जीव की प्राण वाटायचे.

सीतामाईला रावणाने लंकेत नेताना तिचे अश्रू जमिनीवर ओघळले आणि त्याचीच ही वनस्पती म्हणजे सीतेची टीपं अर्थात सीतेचे अश्रू असे बरेचदा ऐकिवात आलेले. काही गोष्टी समजुतीने जरी गोष्टीच्या रूपात ऐकिवात आल्या तरी विचार करायला भाग पाडतात हे नक्की! मुळीतील पाणीदारपणाने ते स्पष्टही व्हायचे. खरंच हे असे असेल का? असा प्रश्नही बरेचदा पडलेला. पावसातील ही मुळी ठरावीक पट्ट्यातच फुलून यायची. येण्या-जाण्याच्या मार्गात असलेली ही वनस्पती कायम नजरेस पडायची. हातात घेतली की अश्रूचा पाणीदारपणा जाणवायचा. सीतामाईवर ओढवलेल्या प्रसंगाची आठवण करून देणारे हे सीतेचे अश्रू आजही आपल्या अस्तित्वाची खूण दर्शवतात याचे आश्चर्य वाटायचे. रानमाळावर ओघळलेल्या अश्रूंची झालेली ही फुले जेव्हा पावसानंतर सुकून जायची तेव्हा मात्र त्या मुळींचे रूपांतर काट्यात व्हायचे. ते माळरान पूर्ण गवताळ व्हायचे. ती फुलांची चादर पावसानंतर विरून जायची आणि पुन्हा कातळ दिसू लागायचं, पण या मुळीचं अस्तित्व मात्र कधीच मिटायचं नाही. चालताना जर या सुकलेल्या मुळीवर पाय पडला, तर काटेरी मुळी पटकन पायात रुतायची आणि टचकन आपल्या डोळ्यांत पाणी यायचे. मग त्या रस्त्याने जावेसे वाटायचे नाही. इतका दाह त्या मुळीत समरसलेला असायचा. त्या मुळीला सीतेचे अश्रू संबोधण्यामागे कारण काय ते नंतर लक्षात आले. डोळ्यांतून जरी अश्रू सुकून गेले तरी त्याच्या वेदना मात्र कायम राहतात, याचे उदाहरण त्या सुकलेल्या फुलांच्या मुळीवरून जाणवलेले अनेकदा. सीतेचे अश्रू ओघळताना पाहिले नसले तरी तिच्या वेदना मात्र समस्त स्त्री वेदनांचे प्रतिनिधित्व करणाऱ्याच भासवून जातात. स्त्रीयांवर होणाऱ्या अन्याय, अत्याचाराचा त्यांच्या मनावर होणारा आघात आणि ओघळणारे अश्रू जरी दिसत नसले तरी त्यांना होणाऱ्या वेदना या कधीही न मिटणाऱ्याच.

अनेक वेदनांचे प्रतिबिंब घेऊन उमलणारी ती फुलांची मुळी सीतेच्या अश्रूंची आठवण करून देणारी असली तरी या अश्रूंमागे अनेक वेदनांचा ठाव घ्यायलाही तितकीच भाग पाडणारी. तिच्या नशिबी आलेला वनवास, व्यथित केलेले जीवन, रावणाने वेश बदलून उगवलेला सूड, राम-रावण युद्ध आणि त्यानंतर पुन्हा सीतामाईच्या नशिबी आलेला वनवास, अग्निपरीक्षेचे दिव्य आदी घटना पाहता तिच्या वेदनांचा ठाव घेता येतो.माळरानावर उगवणारी फुलांची मुळी ही समजुतीतून आलेल्या कथेचे रूपक असले तरी नकळतच जशी सीतामाईच्या अश्रूंच्या वेदनांचाही ठाव घेणारी ठरते. तशी समाजात एक नवा आदर्श घालून देणारीही ठरते. स्त्रीचा अनादर नको, मुलीचा अपमान नको, पत्नीवर संशय नको. स्त्री वेदनांची ओळख घडविणारी ही फुलांची मुळी माळरानावर आजही फुलत असेल. आपल्या अस्तित्वाची प्रचिती आजही देत असेल. मात्र समाजात घडणाऱ्या घटना पाहता आज ते केवळ सीतेचे अश्रू म्हणून भास देत नाहीत, तर समस्त स्त्री वेदनांनाही नकळतच गवसणी घालतात एवढे मात्र नक्की!

# जेनेरिक मेडिसीन मार्केटमध्ये भारताची भागीदारी वाढणार



येत्या ५-६ वर्षांत जगभर पेटंट रद्द करण्यात येणार असल्यामुळे जीवनावश्यक औषधांच्या पेटंटमुळे भारतीय औषध उत्पादक कंपन्यांना अनेक संधी निर्माण होणार आहेत.केअर रेटिंगच्या अहवालानुसार सन २०२६ पर्यंत २४० बिलियन अमेरिकन उत्पादनाचे पेटंट रद्द होणार आहे.अहवालानुसार भारतीय फार्मास्युटिकल कंपन्या या संधी लक्षात घेऊन उत्पादन क्षमता वाढवित आहेत. असे मानण्यात येत आहे की, भारतीय कंपन्या येत्या काही वर्षांत ५०६ बिलियन डॉलरचे उत्पादन करू शकतील.याचे सर्वांत मोठे कारण भारतात होणारे किफायती उत्पादन आहे. शिवाय संशोधन आणि क्लीनिकल ट्रायलच्या बाबतीत भारत विकसित देशांच्या तुलनेत स्वस्त ठरतो. हे सर्व गृहीत धरून भारत केवळ अमेरिकन मार्केटमध्येच नव्हे तर अशा औषधांची गरज असलेल्या दुसऱ्या देशातही जेनेरिक औषधे सहज विकू शकेल.

कोणत्याही औषधाच्या पेटंटचा कालावधी २० वर्षे असतो. बीपीसारख्या आजाराव्यतिरिक्त कॅन्सरच्या इलाजाच्या औषधांचे पेटंट येत्या काही वर्षांत रद्द होणार आहेत.जीवन रक्षक औषधे स्वस्त होणार इंडियन ड्रग मॅन्युफॅक्चरिंग असोसिएशनचे सरचिटणीस दारा पटेल म्हणाले की, औषधांना जेनेरिक मार्केटमध्ये तयार होणार असल्यामुळे किमती ४० ते ५०% कमी होतील. जागतिक मार्केट वाढल्यामुळे व्यवसाय वाढविण्यासाठी भारतीय कंपन्यांना अनेक संधी मिळतील.यामुळे ज्या कंपन्यांकडे औषधांचे पेटंट आहे, त्यांच्या व्यवसायावर दडपण असेल.कारण आतापर्यंत ज्या कंपन्या ही उत्पादने तयार करीत होती त्यापेक्षा दुप्पट उत्पादन इतर कंपन्या करू लागतील.

# सुंदर आणि स्लिम होण्यासाठी या गोष्टी टाळल्याच पाहिजेत...

**चॉकलेट मिल्क :** याच्या एका ग्लासमध्ये २०० ते २५० कॅलरी असतात. दुधामध्ये चॉकलेट आणि साखर टाकल्याने कॅलरीचे प्रमाण वाढते.

**बनाना मिल्कशेक :**याच्या एका ग्लासमध्ये १०० पेक्षा अधिक कॅलरी असतात. त्यामुळे हे प्यायल्याने वजन वाढते. यामध्ये प्रोटीन, कार्बोहायड्रेट आणि फॅट मोठ्या प्रमाणात असते.

**म्हशीचे दूध :** एक कप म्हशीच्या दुधात जास्त कॅलरी असतात. यामधील फॅट वजन वाढवतात.

**कॉफी :** यामध्ये असणार्या कॅफीन आणि साखरेमुळे कॅलरी वाढतात. एका कॉफीमध्ये २०० किंवा यापेक्षा जास्त कॅलरी असू शकतात.

**मलाई लस्सी :** लस्सीमध्ये असलेली साय आणि साखर फॅटचे प्रमाण वाढवते.

**स्मूदीज :** यामध्ये प्रोटीन, कार्बोहायड्रेट आणि फॅट मोठ्या प्रमाणात असतात. साखर टाकल्याने यामधील कॅलरीचे प्रमाण वाढते.



# वजन कमी करण्याचे काही साधे उपाय

वजन कमी करणं हे अनेकांना आव्हानापेक्षा कमी वाटत नाही. पण, जर सोपे-साधे उपाय अवलंबले, तर वजन कमी करणे अवघड अजिबातच नाही...

**व्यायाम सुरूच ठेवा**

शरीराला सैल सोडू नका. सकाळी लवकर उठू शकत नसाल, तर घरीच व्यायाम करा. यामुळे शरीराची काम करण्याची इच्छा टिकून राहील.जर व्यायाम किंवा मॉर्निंग वॉक करण्यासाठी तुमच्याकडे वेळ नसेल, तर पायी चालण्याची संधी सोडू नका. संध्याकाळी फिरा किंवा पायी बाजारात जा. इतर कामं करतानाही पायी चालण्यास प्राधान्य द्या. याशिवाय या ऋतूत खेळ, नृत्य यांसारख्या ॲक्टिव्हिटीजमध्ये भाग घेऊ शकता. यामुळे आरोग्य चांगलं राहण्यास मदत होईल. शरीरातही उष्णता टिकून राहील.

**लो फायबरयुक्त आहार**

खूप जास्त कॅलरी, चटकदार, मसालेदार पदार्थांचं सेवन करू नका. जंक फुडही कमी प्रमाणात खा. यामुळे आजारांना आमंत्रण मिळते.भूक लागल्यानंतर हेल्दी स्नॅक्स खा. विशेषतः फायबर्सयुक्त फळं आणि भाज्या खा. शक्यतो रिकाम्या पोटी पार्टीला जाऊ नका. तर गाजर, सलाद, सफरचंद, सूप इत्यादी खाऊन जा.

**चहा- कॉफीवर नियंत्रण**

थंड हवामानात गरम-गरम चहा आणि कॉफी पिण्याची इच्छा न होईल तर नवलच! पण, यामध्ये असणारे निकोटीन आणि कॅफिन आरोग्यासाठी चांगले नाही. यामध्ये अधिक कॅलरी असतात.यामुळे आरोग्याचं नुकसान होतंच म्हणून चहाऐवजी ग्रीन टी, हर्बल टी किंवा ब्लॅक टी यांचा पर्याय निवडा. त्याचबरोबर पचनक्रिया ठिक ठेवण्यासाठी पुरेशा प्रमाणात पाणी प्या.

# वासुदेव आला हो वासुदेव आला



काही दिवसांपूर्वी एकदा खेळण्यांच्या दुकानात गेले असता तेथील नाना प्रकारची खेळणी, शोभेच्या बाहुल्या, छोट्या मोठ्या वाहनांच्या प्रतिकृती, काही अभ्यासू खेळ, काही मनोरंजनाचे तर काही डोक्याला-विचारांना चालना देणारे नवनवीन आकर्षक खेळ पाहण्यात मी मग्न झाले होते. एवढ्यात अचानक एका चिमुरडीच्या रडण्याच्या आवाजाने माझी एकाग्रता भंग पावली. ती लहान मुलगी आईचा हात ओढत तिच्या चिमुकल्या डोळ्यांतून भली-मोठी आसवं गाळत म्हणत होती,

आई मला हाच सांताक्लॉज हवाय, बघ ना किती क्यूट दिसतोय तो आणि स्वीट गातोय! मी त्या रडणाऱ्या मुलीकडे आणि तिला समजावणाऱ्या आईकडे बघत राहिले. मग माझं लक्ष गेलं ते लांबसडक पांढऱ्या शुभ्र दाढीवाल्या ढगळ लाल सदरा घातलेल्या सांताबाबाकडे! आणि त्याच्याकडे पाहता पाहता मला माझ्या लहानपणीचा तो दिवस आठवला, जेव्हा मोठी साद घालत असाच एक बाबा दारोदारी टाळ आणि चिपळ्या वाजवत, नाचत, गाणी म्हणत भल्या पहाटे आम्हाला झोपेतून उठवायला दारी येई. आधी वाटायचं, आईने आम्हाला सकाळी लवकर उठवण्यासाठी हे कुठलं तरी गाणं लावलंय की काय? पण दररोज येणारा तो मधुर आवाज हळूहळू आम्हाला आवडायला लागला. आमच्या परिचयाचा झाला, तर आमच्या या बाबाचं नाव होतं वासुदेव! आई त्याला कधी घरातील धान्य, कधी पैसे देत असे व तो समाधानाने आशीर्वाद देऊन गात गात पुढे मार्गस्थ होत असे.

दान पावलं, बाबा दान पावलं<br>
वासुदेव आला, हो वासुदेव आला<br>
सकाळच्या प्रहरी हरिनाम बोला ।।

हे बोल गात गात वासुदेव नित्यनेमाने सूर्य उगवल्याप्रमाणे रोज अवतरत असे. वासुदेवाची हाळी ऐकून आम्ही भावंडं अंथरुणातून पटकन उठून तयारी करून बसत असू आणि जसजसा त्याचा आवाज जवळ येई तसंतसं आतुरतेने त्याच्या प्रतीक्षेत दारात उभे राहत असू. आईलाही बरं वाटे की, कधीही लवकर न उठणारी ही मुलं वासुदेवाच्या दर्शनासाठी, त्याचा आवाज ऐकण्यासाठी लवकर उठू लागली आहेत आणि शहाण्यासारखी वागू लागली आहेत. सांताबाबासारखीच आमच्या या वासुदेवाकडेही एक जादूची झोळी असायची. त्यात तो नाना तऱ्हेचे पदार्थ, वस्तू, पैसे असं काहीबाही ठेवत असे. वाटायचे की, ही झोळी आहे की जादूची गुहा? जी कधी संपतच नाही. त्या झोळीला अनेक कप्पे असायचे आणि त्यात सगळं काही सामावून जायचं. वासुदेवाने गायलेले अभंग, कवनं, ओव्या, गाणी तेव्हा आम्हालाही पाठ होऊन गेली होती. त्याचा आवाज असा काही टिपेला लागे की, ऐकताना समोरच्याचं चित्त हरवून जाई. आई म्हणायची की, त्याला दान दिलं की ते पावतं. त्याचा आशीर्वाद सगळ्यांना लाभतो. असा हा वासुदेव आम्हाला विलक्षण बुद्धिमानही वाटे. कारण त्याला सगळी गाणी अभिनयासहित तोंडपाठ असत. शिवाय तो अखंड बोलत असे.

खरं तर वासुदेव ही महाराष्ट्रातील एक प्राचीन परंपरा. वारकरी पंथातील कृष्णवंशातील कृष्णाचे भक्त म्हणून घेणारी जमात म्हणजे वासुदेव. कलेला सोबत घेऊन लोकांना संगीतातून जागृत करण्याचं कार्य हा वासुदेव करत असे. कृष्णाची प्रतीकं म्हणून कपाळावर गंध, मोरपिसाचा उंच टोप, घेरदार झगा, सुरवार किंवा धोतर, खांद्यावर उपरणं, गळ्यात झोळी, कमरेला छोटी बासरी अशा रूपात हा वासुदेव गावागावांत भिक्षा मागत फिरायचा.

हा वासुदेव एकाच वेळी एका हाताने टाळ दुसऱ्या हाताने चिपळी, साथीला पायातील घुंगरांचा लयबद्ध नाद करत उपदेशात्मक अभंग बोधात्मक कवनं यांची वैविध्यपूर्ण रचना करून समाजाला प्रबोधन करीत असे. हे समाज कल्याणाचं कार्य तो फार पूर्वीपासून करत आलाय. अगदी शिवरायांच्या काळातही या बहुरूप्या वासुदेवाने हेरगिरीचं काम करून स्वराज्याच्या कार्यास हातभार लावल्याचे दाखलेही इतिहासात सापडतात. वासुदेव भल्या पहाटे हरिनामाचा जयघोष करत गावाला जागवतो. लहान-थोरांना गोष्टी सांगून त्यांचं मनोरंजन तर करतोच. पण समाजात सकारात्मक बदल घडवून आणण्याची ताकद त्याच्या गाण्यात, आवाजात आणि एकूणच त्याच्या दर्शनात असते. त्याचा मधुर आवाज, चेहऱ्यावरील निरागस भाव आणि गाण्यातून व्यक्त होणारी आपुलकी, प्रेम देत तो सर्वांना आपलंसं करून टाकी. भक्तिभावातून जनसामान्यांचं मनोबल वाढवत समाज प्रबोधनाचं महान कार्य तो अविरत करत असे.

पण कालांतराने गावांना शहराचं रूप मिळालं अन् माणसं यंत्रवत जगू लागली. जागोजागी मोठमोठ्या इमारती, अपार्टमेंट उभी राहू लागली. त्यामुळे वासुदेवाला सहजतेने शिरकाव करणं आणि लोकांना भेटणं मग अशक्य होऊ लागलं. गल्ली-रस्त्यातून हाळी देत जाणारा वासुदेव आजही कधीतरी दुरून दिसतो. कोणी बोलावलं, तर येतो. नाहीतर नाइलाजाने आल्यापावली निघूनही जातो. पण एकूण त्याचं गाणं आणि दर्शन आता हळूहळू कमी कमीच होत चाललेलं आहे. आजच्या टच स्क्रीनच्या जमान्यात कॉन्व्हेंटमध्ये शिकणाऱ्या मुलांना सकाळी जागवणाऱ्या वासुदेवापेक्षा रात्री उशिरा येणारा सांताक्लॉज अधिक जवळचा वाटू लागला आहे. सांताक्लॉज म्हणे मुलांना गिफ्ट देतो. म्हणून ती त्याची वाट पाहतात. पण आपल्या मराठी मातीतल्या, आपल्या लोकपरंपरेचा वारसा पुढे चालवणाऱ्या साध्या भोळ्या वासुदेवाचा मात्र आज सर्वांनाच विसर पडत चालला आहे. नव्या पिढीला वासुदेवाचं आकर्षण वाटत नाही. अनेकांना त्याच्याबद्दल माहितीही नाही. अजूनही ग्रामीण भागात वासुदेव बरेचदा येतो. पण त्याची हाक सर्वांपर्यंत पोहोचत नाही किंवा पोहोचली तरी त्याची फारशी दखल घेतली जात नाही.

त्याच्याकडून मिळालेला उपदेश, त्याच्या आवाजातील गाणी, त्याची अलौकिक वेशभूषा आणि त्याची पिढीजात कला हा आपल्या संस्कृतीचा गौरव बिंदू आहे. मात्र दुर्दैवाने काळाच्या पडद्याआड आता तो झाकून गेलाय. आजही काही वासुदेव घराण्याचा वारसा म्हणून चिकाटीने ही कला जपताना दिसतात, पण त्यांना शासनाकडून किंवा समाजाकडून थोडंफार साहाय्य आणि प्रोत्साहन मिळालं, तर ही लोकपरंपरा जिवंत राहील आणि खऱ्या अर्थाने ङ्गदान पावलंफ असं खुद्द या वासुदेवाबद्दल आपल्याला म्हणता येईल.

# नर्जी-प्रोटीनसाठी नाश्त्यात दूध-फळे घ्या

उपवासात अनेकजण सायंकाळी जेवतात. अशावेळी सकाळची सुरुवात दूध व एका फळाने करावी. कारण यामुळे एनर्जी व प्रोटीन दोन्हीही एकाच वेळी मिळेल. दुपारच्या खाण्यात शिंगाड्याच्या पीठाची भाकरी व जर साबुदाणा खिचडी खात असाल तर ती एक वाटीपेक्षा जास्त घेऊ नये. त्यात दोन मोठे चमचे शेंगदाणे अवश्य मिसळा.



**तेल-तूप मर्यादित खा. लिक्विड डाएट उपयुक्त** उपवासात वरई व शिंगाड्याचे पीठ, मखाना, नट्स व फळे घेऊ शकता. डाएटमध्ये शहाळे, लिंबूपाणी घ्यावे. उकाडा जास्त असेल तर लिक्विड डाएट आपल्याला हायड्रेट ठेवण्यास मदत करील. पहिल्यांदाच उपवास करीत असाल तर जे जंक फूड वा बाहेरचे पदार्थ जास्त खात असतील त्यांच्यासाठी पहिल्यांदा उपवास करणे कठीण असते. यासाठी उपवासात दर दोन-तीन तासांनंतर काही अवश्य खा. जास्त भूक लागल्यास आपण एक बाऊल सॅलड खाऊ शकता. याशिवाय फळांचा रस व लिंबूपाणी घेऊ शकता. नवरात्रासारख्या उपवासाचा डाएट प्लॅन

**सकाळी :** एक ग्लास लिंबूपाणी वा दूध.

**नाश्ता :** फळे व ड्रायफ्रूट्स.

**लंच :** वरईच्या पीठाची भाकरी, उपमा, उत्तप्पा, दही व रायता.


**संध्याकाळचा नाश्ता :** ग्रीन टी, चहासोबत भाजलेला मखाना

**डिनर :** रताळ्याचे चाट, टोमॅटो व काकडीचे सॅलड.

**झोपण्यापूर्वी :** दालचिनीचे दूध

कोव्हिड पेशंटने उपवास करू नये जे गेल्या सहा महिन्यांमध्ये कोव्हिडमधून रिकव्हर झाले आहेत त्यांना सजेशन आहे की, त्यांनी उपवास करू नये. कारण शरीरात आधीपासूनच वीकनेस असतो. अशावेळी जर दीर्घकाळपर्यंत उपाशी राहाल तर समस्या वाढू शकते. कोव्हिडमधून रिकव्हरी होण्यास वेळ लागतो.

# सजग राहून आपण कर्करोगाला हरवू शकतो




कर्करोगाला दबक्या पावलांनी येणारा आजार असे म्हंटले जाते. म्हणूनच हा आजार होऊ नये यासाठी उत्तम जीवनशैलीबरोबरच सजगता खूप महत्त्वाची आहे.

हृदय रोगानंतर जगात कर्करोग हा आजार सर्वाधिक बघायला मिळतो. कर्करोगाची सुरुवातीची लक्षणं खूप सामान्य असतात. म्हणूनच लोक त्याकडे विशेष लक्ष देत नाहीत. जर खाली दिलेली लक्षणं दिसत असतील तर सतर्क व्हा. आपल्या डॉक्टरांकडे जाऊन आवश्यक त्या तपासण्या करून घ्या. ही आहेत लक्षणं... जखम किंवाफोड जो ठीक होत नसेल अपचन किंवा अन्न गिळण्यास त्रासअंगावरचे तीळ किंवा मस यामध्ये बदल होणे स्तन किंवा शरीराच्या अन्य कोणत्याही भागात गाठ येणे मूत्र अथवा मलत्यागाच्या सामान्य सवयीत सतत बदल होणे सतत खोकला आणि घशाची खवखव औषधोपचारानंतरही बरी न होणे शरीरात नेहमीपेक्षा वेगळे असे स्त्राव होणे किंवा रक्तस्त्राव वजन झपाट्याने कमी होणे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# बंद घरातून साडेपाच लाखांचा ऐवज लंपास...

## पोलिस अधीक्षकांची घटनास्थळी भेट...

जनसंचलन/ खामगाव

शहरामध्ये चोरीच्या घटनांमध्ये दिवसेंदिवस वाढ होत असतानाच ७ फेब्रुवारी रोजी पुन्हा चोरीची घटना समोर आली आहे. राणा लकी शाळेजवळ समोरील एका बंद घरातून चोरट्यांनी ५ लाख ५६ हजार ८०० रुपयांचा मुद्देमाल लंपास केला. चोरट्यांनी सोन्याचे दागिने आणि १ लाख ३० हजार रुपये नगदी असा ऐवज लंपास केला आहे. दरम्यान, घटनास्थळी पोलिस अधीक्षकांनी भेट देऊन तपासाची दिशा पोलिसांना सांगितली. शहरामध्ये एका घटनेचा तपास सुरू होत नाही तोच दुसऱ्या चोरीचा गुन्हा घडत आहे. गेल्या आठ ते दहा दिवसांपासून चोरींच्या घटनांमध्ये वाढ होत असताना पोलिस मात्र तपास सुरू आहे, असे सांगून हात झटकत असल्याचे चित्र आहे. शहरातील शेगाव रोडवरील राणा लकीजवळ राहणारे आशिष सतीश जैस्वाल (वय २७) यांच्या बंद घरातून चोरट्यांनी ६ फेब्रुवारी रोजी सोन्या-चांदीचे दागिने आणि रोख १ लाख ३० हजार रुपये असा ५ लाख ५६ हजार ८०० रुपयांचा मुद्देमाल चोरी केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. त्यांनी शहर पोलिस ठाण्यात तक्रार दिल्यानंतर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास खामगाव शहर पोलीस करीत आहेत

# लोणार विकासावर मंत्रालयात बैठक...

जनसंचलन/मेहकर

जगप्रसिद्ध लोणार सरोवराच्या विकास आराखड्यासह पर्यटन महोत्सव आयोजनाच्या मागणीसंदर्भात सोमवारी, १० फेब्रुवारी रोजी मंत्रालयात बैठक होणार आहे. पर्यटनमंत्री शंभूराज देसाई यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या बैठकीत विविध प्रशासकीय अधिकारी, तसेच माजी आमदार संजय रायमुलकर उपस्थित राहणार आहेत. माजी आमदार संजय रायमुलकर यांनी दि. २९ जानेवारी रोजी पर्यटनमंत्र्यांना दोन पत्रे सादर करून लोणार येथे महाबळेश्वरच्या धर्तीवर पर्यटन महोत्सव आयोजित करण्याची तसेच लोणार विकास आराखड्यावर सविस्तर चर्चा करण्यासाठी बैठक घेण्याची मागणी केली होती. या पार्श्वभूमीवर पर्यटनमंत्र्यांचे खासगी सचिव प्रल्हाद हिरामणी यांनी बैठकीचे आदेश निर्गमित केले. पर्यटन विभागाचे प्रधान सचिव, पर्यटन संचालनालयाचे संचालक, व्यवस्थापकीय संचालक (महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ), जिल्हाधिकारी (बुलढाणा), मुख्य वनसंरक्षक (अमरावती), उपसचिव (कला व सांस्कृतिक विभाग) आदींसह इतर या बैठकीला उपस्थित राहणार आहेत.

# सातव्या आदिवासी उलगुलान वेध साहित्य संमेलनाच्या परिसंवादात प्रशांत सोनोने यांचा सहभाग

जनसंचलन/बुलढाणा



आदिवासी साहित्य आणि संवर्धन संस्थेतर्फे आयोजित सातव्या आदिवासी उलगुलानवेध साहित्य संमेलनाच्या महत्वपूर्ण परिसंवादात येथील सुप्रसिध्द छायाचित्रकार, जल जमिन जंगल चळवळीचे कार्यकर्ते तथा आदिवासी संस्कृतीचे अभ्यासक प्रशांत सोनुने हे प्रमुख वक्ते म्हणून सहभागी होणार आहेत.

वर्धा जिल्ह्यातील हिंगणघाट येथे ९ फेब्रुवारी रोजी हरीओम सभागृहात संमेलन होणार असून प्रा. डॉ. अनुज लुगुन संमेलनाध्यक्ष आहेत. या संमेलनात आदिवासींच्या उत्थानार्थ व सशक्तीकरणासाठी बिरसांचा उलगुलान आणि लोकलढा हाच निर्णायक पर्याय या विषयावर महत्वपूर्ण परीसंवाद होणार असून यामध्ये महाराष्ट्रातील नामवंत विचारवंतासह प्रमुख वक्ते म्हणून प्रशांत सोनुने यांना निमंत्रित करण्यात आले आहे. आदिवासींच्या साहित्य व संस्कृतीचे अभ्यासक तथा आदिवासींच्या उत्थानासाठी देशपातळीवर संघर्ष लढ्यात योगदान देणारे समर्पित कार्यकर्ते म्हणून प्रशांत सोनुने यांची ओळख आहे. जल जमिन जंगल चळवळीचे ते प्रमुख शिलेदार आहेत. यापूर्वीच्या आदिवासी साहित्य संमेलनात सोनुने यांचा सहभाग उल्लेखनीय राहिला आहे.

# वाचन संस्कृतीच्या विकासासाठी प्रयत्न आवश्यक!

जनसंचलन/मेहकर

ज्ञानसंपन्न आणि माहितीसमृद्ध समाज घडविण्यासाठी वाचन संस्कृतीचा प्रचार, प्रसार आणि विकास होणे आवश्यक आहे, असे मत शिवशक्ती बहुउद्देशीय संस्था, मेहकरचे कोषाध्यक्ष भास्करराव गारोळे यांनी व्यक्त केले. स्व. दत्तात्रय सखाराम पायघन सार्वजनिक वाचनालय, अंजनी बु. येथे आयोजित कार्यक्रमात ते गुरुवारी बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वाचनालयाचे अध्यक्ष गजानन पायघन होते. प्रमुख अतिथी म्हणून शिवशक्ती बहुउद्देशीय संस्थेचे सचिव दशरथ वाचनालयाला ग्रंथ भेट देण्यात आले. हजार रूपये किंमतीचे ग्रंथ वाचनालयाला . भेट दिले चनखोरे, दिनकरराव गारोळे, उद्धव सेनेचे तालुकाध्यक्ष निंबाजी पांडव, महात्मा फुले व्यायामशाळेचे संचालक संतोष नेहुल, आयुब पठाण, ओमप्रकाश बाजड, राजुभाऊ आव्हाळे, संतोष लाड, भागवत पुंड, अश्विन साबळे, विश्वनाथ चवाळे, रामकीसन पायघन आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ग्रंथपाल गणेश आल्हाट यांनी केले, तर आभार गजानन पायघन यांनी मानले. भास्करराव गारोळे यांनी वाचनालयाला ५ हजार रुपयांचे ग्रंथ भेट दिले. वाचनसंस्कृती वृद्धिंगत करण्यासाठी प्रत्येकाने पुस्तके वाचावी आणि ग्रंथालयाचा अधिकाधिक उपयोग करावा, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

# केसगळतीचा शोध जारीच!


## साडेबावीस किलो धान्य मुंबईच्या प्रयोगशाळेत!

जनसंचलन/बुलढाणा

शेगाव तालुक्यातील टक्कल बाधितांवर पद्मश्री हिम्मतराव बावस्कर यांच्या टीमने केस गळतीचे कारण सिलेनियमचे प्रमाण जास्त असल्याचे सांगितले अधिकृत कारण अद्यापही अस्पष्ट आहे. दरम्यान हॅलो बुलढाणाच्या माहितीनुसार संबंधित गावातील साडे २२ किलो धान्य काल मुंबई प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठविण्यात आले आहे.दरम्यान काल नव्याने १४ रुग्ण आढळल्याने चिंता व्यक्त होत आहे. बुलढाणा जिल्ह्यातील शेगाव तालुक्यातर्गत ११ गावांमध्ये २२९ हून अधिक केस गळतीचे रुग्ण संख्या झाली आहे. दरम्यान शास्त्रज्ञ या केस बाधितांच्या केसांच्या मुळापर्यंत गेले असून, याच्या नेमक्या कारणाचा अधिकृत खुलासा आरोग्य विभागाकडून झाला नाही. अचानक केस गळतीच्या अजब आजाराचे मुळ शोधण्यासाठी दिल्ली, चेन्नई येथील शास्त्रज्ञ, होमिओपॅथी आयुष युनानीचे तज्ञ डॉक्टरांना संशोधन कार्यासाठी पाचारण करण्यात आले होते. संशोधनाअखेर जमिनीत व पाण्यामध्ये सिलेनियमचे प्रमाण जास्त आढळल्यामुळे ही केस गळती होत असल्याचे पद्मश्री



हिम्मतराव बावस्कर यांनी एका वृत्तवाहिनीला सांगितले. काल नवीन रुग्ण आढळलेल्या गावात आरोग्य विभागाकडून सर्वेक्षण सुरू झाले आहे तर संबंधित गावातील २३ किलो धान्य पुन्हा मुंबईच्या प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठविण्यात आले आहे.लवकरच या केसगळती प्रकरणाचा निष्कर्ष समोर येईल असे सूत्रांनी सांगितले.



# कालभैरवलाही भिले नाहीत बुलढाण्याचे हे ३ बारके!
# घंटा,दानपेटीवर करणार होते हात साफ!
# करवतीने कापले मंदिराचे कुलूप!

**जनसंचलन/चिखली**

शहरातील ३ बारक्यांनी अर्थात १५ ते १७ वयोगटातील चोरट्यांनी देवालाही सोडले नाही.चिखली तालुक्यातील हातनी शिवारातील कालभैरव मंदिरात या चोरट्यांनी मंदिरात कुलूप करवतीने कापून दानपेटी देखील फोडली.तांब्याचा घंटा देखील चोरून नेण्याचा त्यांचा पक्का इरादा होता परंतू त्यांचा हा डाव फसला असून या चोरट्यांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. हे चोरटे तुळशी नगर बुलढाणा,अंत्री तेली हल्ली मुक्काम महावीर नगर बुलढाणा, केशवनगर बुलढाणा येथे राहतात. (चोरटे ते १७ वयोगटातील असल्याने त्यांची नावे टाळत आहोत) चिखली तालुक्यात चिखली ते बुलढाणा रोडवर श्री भैरवनाथ



सेवा ट्रस्टचे हातनी येथे भैरवनाथचे मंदिर आहे.मंदिराला लोखंडी दरवाजा आहे.मंदिरात साडेतीन फूट उंचीची तीन पत्राची लोखंडी दानपेटी आहे.मला मोठा पाच किलो वजनाचा तांब्याचा घंटा आहे.रात्री आठ साडे आठ दरम्यान बुलढाणा येथील चोरट्यांनी मंदिराचे कुलूप करवतीने कापले.मंदिरात प्रवेश करून दानपेटीची कुलपही अर्धवट कापले होते.घंटा तोडून खाली ठेवला होता.दरम्यान गावातील दोन ते तीन व्यक्तीं दर्शनासाठी मंदिरावर गेले असता त्यांना चोरीचा संशय आल्याने त्यांनी आत पहिले तर चोरटे आपली करामत करताना दिसले.दरम्यान तिन्ही व्यक्तींनी या चोरट्यांना कोंडून ठेवले.मंदिरचे सचिव रवी अमरसिंग जाधव यांना याबाबत कळविले असता त्यांनी पोलिसांना माहिती देऊन तिन्ही चोरट्यांना पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

# दुचाकीस्वाराचा चिरडून जागीच मृत्यू!

**जनसंचलन/खामगाव**

अपघातांच्या घटनेत वाढ होत असून दोन ते अडीच तासापूर्वी बाळापुर खामगाव हायवे वर एका दुचाकीचा भीषण अपघात झाला.या अपघातात दुचाकीस्वार जागीच ठार झाला आहे.संतोष शर्मा अकोला असे मृतकाचे नाव समजते.ते शेगाव येथील स्व. दामोदर झाडोलीया यांचे जावई असल्याचेही कळते. संतोष शर्मा हे एम एच २८-बी एस २२४० या क्रमांकाच्या दुचाकीने जात होते.अपघात नेमका कसा झाला याची माहिती मिळाली नाही परंतु संतोष शर्मा हे चिरडल्या गेल्याने जागीच ठार



झाले आहेत.त्यांच्या डोक्यावरूनच वाहन गेल्याचे प्राथमिक चित्र आहे. शेगाव येथील स्व. दामोदर झाडोलीया यांचे ते जावई असल्याचेही कळते.




# उभ्या टँकरचे टायर लंपास चोरट्यांविरुद्ध गुन्हा

**जनसंचलन/मेहकर**

शहरातील डोणगाव रस्त्यावर पेट्रोल पंपावर उभ्या करून ठेवलेल्या टँकरचे तीन टायर किंमत ६० हजार आणि ५० लीटर डिझेल अज्ञात चोरट्याने लंपास केल्याची घटना ६ फेब्रुवारी रोजी घडली. या प्रकरणी पोलिसांनी अज्ञात चोरट्यांविरुद्ध ७ फेब्रुवारी रोजी गुन्हा दाखल केला आहे. शुभम गजानन धोंडगे यांनी पोलिसात फिर्याद दिली आहे. चोरट्यांनी उभ्या टँकरचे दोन आणि स्टेपनी टायर व डिझेल लंपास केल्याने वाहनांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे

# खडकपूर्णा जलाशयातील दोन बोटी उडविल्या!

**जनसंचलन/ देऊळगावराजा**

अवैध रेती उपशावर आळा घालण्यासाठी प्रशासनाने कठोर पावले उचलली आहेत. सिंदखेडराजा उपविभागीय अधिकारी प्रा. संजय खडसे यांच्या मार्गदर्शनाखाली तहसील प्रशासनाने विशेष मोहीम राबवत खडकपूर्णा जलाशयात अवैध रेती उपसा करणाऱ्या दोन बोटी ७ फेब्रुवारी रोजी नष्ट केल्या. तहसीलदार वैशाली डोंगरजाळ, नायब तहसीलदार सायली जाधव, मंडळ अधिकारी विजय हिरवे, ग्राम महसूल अधिकारी विलास नागरे आणि महसूल सेवक शरद काकडे व गजानन टेकाळे यांच्या पथकाने ७ फेब्रुवारी रोजी ही कारवाई केली. मेहुणाराजा आणि चिंचखेड शिवारातील चोखामेळा जलाशयाजवळ अवैध उत्खनन करताना संबंधित बोटी आढळून आल्या. महसूल प्रशासनाने तत्काळ कारवाई करत जिलेटिनच्या साहाय्याने त्या जागेवरच नष्ट केल्या

# शिवसेना मुख्यनेते राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त आज संतनगरी शेगाव येथे मोफत नेत्र तपासणी शिबीराचे आयोजन ....!

**जनसंचलन/ शेगाव**

शिवसेनेचे मुख्यनेते राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त शेगाव येथे मोफत नेत्र तपासणी मोतीबिंदु काचबिंदू शस्त्रक्रियासह चष्मे वाटप व औषधी उपचार शिबिराचे आयोजन करण्यात आला आहे . आरोग्यसेवा हीच ईश्वरसेवा समजुन संपूर्ण देशामध्ये आरोग्य सेवेचा काम करत असतानाच शिवसेनेचे मुख्यनेते राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त केंद्रीय आरोग्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या संकल्पनेतून मोफत नेत्र तपासणी मोतीबिंदू काचबिंदू शस्त्रक्रियेसह शस्त्रक्रियेसह चष्मे आणि औषध वाटप आरोग्य शिबिराचे आयोजन ९ फेब्रुवारीला शेगाव येथे करण्यात आले आहे सईबाई मोटे उप जिल्हा सामान्य रुग्णालयात येथे



सकाळी ९ वा या नेतृत्वासने शिबिराचे उद्घाटन केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांच्या हस्ते होणार आहे या कार्यक्रमाला कामगारमंत्री आकाश फुंडकर आमदार आमदार संजय कुटे जिल्हाधिकारी डॉ किरण पाटील जिल्हा परिषदेचे सी ई ओ गुलाबराव खरात जिल्हा शल्यचिकित्सक डॉ भागवत भुसारी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ अमोल गिते शिवसेना जिल्हाप्रमुख शांताराम दाणे युवासेना जिल्हाप्रमुख ऋषीभाऊ जाधव महिला आघाडी प्रमुख शारदा पाटील शिवसेना उपजिल्हाप्रमुख राजु मिरगे पाटील शिवसेना तालुका प्रमुख रामभाऊ थारकर पाटील शहर प्रमुख संतोष लिप्ते उपस्थित राहणार आहे या नेत्र तपासणी शिबिरात मोफत चष्मे औषध वाटप आणि काचबिंदू मोतीबिंदू आणि लेन्स संदर्भातील शस्त्रक्रिया ही मोफत केल्या जाणार आहेत सोबतच मोफत चष्मे आणि औषधीचे वाटप करण्यात येणार आहे या शिबीरात तज्ञ डॉक्टरांकडून रुग्णांची नेत्र तपासणी करण्यात येणार आहे या आरोग्य शिबीराचा लाभ गरजू रुग्णांनी घ्यावा असे आवाहन सईबाई मोटे जिल्हाउप रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी श्री नाफडे आणि शिवसेना युवा सेना महिला आघाडीच्या वतीने करण्यात आले आहे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====

संपादक - जितेंद्र कायस्थ 9822720784 ऑफिस :- 9129582958